ARTHA
Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ — पुणें, बुधवार तारीख २५ एप्रिल, १९५६ — अंक १७

## विविध माहिती

**सोलापूरचें नवें स्टेशन**—सोलापूरसाठी बांधण्यांत याव-याच्या नव्या स्टेशनाच्या इमारतीचा पायाभरणीचा समारंभ नुकतांच झाला. सध्यां स्टेशनमध्यें एकच प्लॅटफॉर्म आहे. नवीन इमारत पूर्ण झाल्यावर आणखी दोन प्लॅटफॉर्म उपयोगांत आणले जातील. त्याशिवाय, पार्सलें व माल ह्यांची व्यवस्था करण्यासाठी अधिक मोठ्या कचेऱ्या असतील. इमारतीसाठी १८ लाख रुपये खर्च येईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**आयुर्वेदीय इस्पितळ**—मध्यप्रदेश सरकारनें आयुर्वेदीय पद्धतींचे उपचार करणारें इस्पितळ नागपूर येथें उघडण्याचें ठरविलें आहे. शहरांतील अशा प्रकारचें हें पहिलेंच इस्पितळ होईल. तें स्थापन करण्यासाठी १५ लाख रुपये खर्च येईल. इस्पितळांत येत्या पांच वर्षांत १०० खाटांची सोय करण्यांत येईल. मध्यप्रदेशांत आयुर्वेदीय औषधोपचार करणारे ४,००० दवाखाने स्थानिक स्वराज्य संस्था चालवीत आहेत.

**तांत्रिक शिक्षणाची शाळा**—सुरत येथील पारेख टेक्निकल इन्स्टिट्यूट ही संस्था म्युनिसिपालिटीनें सरकारच्या हवालीं करण्याचें ठरविलें आहे. ह्या संस्थेचें, अधिक उच्च प्रतीचें तांत्रिक शिक्षण देणाऱ्या केंद्रांत रूपांतर करण्याचा सरकारचा विचार आहे. म्युनिसिपालिटीकडून केंद्राला दरसाल १०,००० रुपयांची मदत मात्र चालू ठेवण्यांत येणार आहे.

**नेहरूंची अमेरिकेला भेट**—पं. नेहरू येत्या जून महिन्यांत अमेरिकेला भेट देतील. त्यावेळीं टेलिव्हिजनच्या पडद्यावरून ते अमेरिकन लोकांशीं बातचीत करण्याची शक्यता आहे. त्यांचीं व्याख्यानें करण्याबद्दल अमेरिकेंतील अनेक संस्थांकडून वॉशिंग्टन येथील कचेरींत विचारणा करण्यांत येत आहेत. टेलिव्हिजन कंपन्यांकडूनहि पूसतपास चालू आहे.

**अमेरिकन भांडवलाची गुंतवणूक**—अमेरिकेंतील स्टॅनफोर्ड रिसर्च इन्स्टिट्यूटतर्फे मि. हॅरी रॉबिन्सन हे सध्यां भारतांत आले आहेत. भारतांत खाजगी मालकीचें भांडवल गुंतविण्याची कितपत शक्यता आहे तें अजमाऊन पहाण्याचा त्यांचा बेत आहे. अमेरिकन सरकारचे व्यापार व उद्योगखातें आणि फोर्ड फौंडेशन ह्यांच्यातर्फे हें संशोधन करण्यांत येत आहे.

**विधानसभेंतील टेलिफोनची व्यवस्था**—म्हैसूर राज्याच्या विधानसभेसाठी बांधण्यांत येत असलेल्या इमारतींत अंतर्गत टेलिफोनची व्यवस्था करण्यांत येणार आहे. ह्या कामाचें कंत्राट बंगलोर जवळील टेलिफोनच्या कारखान्याला मिळालें आहे. टेलिफोनची व्यवस्था करण्यासाठी १,५०,००० रुपये खर्च येईल. हें काम चालूं वर्षअखेर पुरें करण्यांत येणार आहे.

**शारीरिक शिक्षणाचें कॉलेज**—भारतीय सरकारतर्फे शारीरिक शिक्षण देणारें एक मध्यवर्ती कॉलेज काढण्यांत येणार आहे. कॉलेजसाठी भोपाळची निवड करण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कॉलेजसाठी ८० लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. पदवीधर विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण देणारा तीन वर्षांचा अभ्यासक्रम कॉलेजमध्यें ठेवण्यांत येईल. प्रत्यक्ष शिक्षणाला प्रारंभ दोन वर्षांनीं होईल.

**त्रावणकोर-कोचीन राज्यांतील गिरण्या**—त्रावणकोर-कोचीन राज्यांतील कापडाच्या गिरण्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या परिस्थितीविषयीं चौकशी करण्यासाठी सरकारतर्फे ७ जणांचें एक मंडळ नेमण्यांत आलें आहे. मंडळांत गिरणीमालकांचे तीन व कामगारांचे तीन प्रतिनिधी घेण्यांत आले आहेत. कामगारांच्या वेतनश्रेणींत सारखेपणा आणण्याच्या प्रश्नाचाहि विचार मंडळानें करावयाचा आहे.

**जपानकडून पोलादाची आयात**—जपानमधील पोलादाच्या कारखान्यांचें एक प्रतिनिधीमंडळ पुढील महिन्यांत भारतांत येत आहे. पोलादाच्या आयातीबद्दल भारतीय सरकारशीं ते वाटाघाटी करणार आहे. येत्या तीन वर्षांत जपानकडून भारत ५,००,००० टन पोलाद आयात करण्याची शक्यता आहे. जपानी पोलादाच्या किंमतीहि वाजवी असतील.

**भोपाळ राज्यांतील प्राथमिक शिक्षण**—चालू वर्षाच्या जुलै महिन्यापासून भोपाळ राज्यांत प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत राज्यांत प्राथमिक शाळांसाठी १५० नव्या इमारती बांधण्यांत येणार आहेत. त्याचप्रमाणें, १२० शिक्षकांच्या कुटुंबांसाठी घरेंहि बांधण्यांत येणार आहेत.

**बुद्धविषयक पुराणवस्तु संग्रहालय**—आंध्रमधील नागार्जुन सागर योजनेच्या स्थळाजवळ बुद्धविषयक प्राचीन वस्तूंचा संग्रह करण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. ह्या ठिकाणीं पूर्वी नागार्जुनकोंडा हें बुद्धपंथीय विद्यापीठ होतें. ह्या भागांतील उत्खननांत सांपडलेल्या वस्तूसंग्रहालयांत ठेवण्यांत येतील. त्यांसाठी सरकार ४·५ लाख रुपये खर्चून इमारत बांधणार आहे.

**सिमेंटच्या उत्पादनाची वाढ**—भारतीय सरकारनें सिमेंटच्या उत्पादनाचें वार्षिक लक्ष्य म्हणून १·२ कोटी टन सिमेंट ठरविलें होतें. परंतु आतां १९६० अखेर १·६ कोटी टनाचें उद्दिष्ट ठेवण्याचा सरकार तातडीनें विचार करीत आहे. देशांत निरनिराळ्या भागांत सिमेंटचे २७ कारखाने आहेत. सर्व कारखान्यांची मिळून वार्षिक उत्पादनक्षमता सुमारें ५० लाख टन आहे.

## धान्याच्या सांठ्याकरितां देशाबाहेर खरेदी कशासाठी?

( रावबहादुर न. सि. जोशी, बी. ई. सिव्हिल, एम. आर. सॅन आय. लंडन, रि. सुपरिंटेंडिंग इंजिनिअर, मुंबई प. वर्क्स खातें, ह्यांचें पत्र )

सा. न. वि. वि.

ता. ९ ची दिल्लीची बातमी आहे कीं, हिंदुस्थान सरकार "गहूं-तांदूळाचा २० लक्ष ( दोन मयुत ) टनांचा सांठा" करणार आहे. प्रश्न नुसता सांठा करण्याबाबतचा असता, तर त्याचा अन्वयार्थ करूं शकतो. पाऊसमान सरासरीपेक्षा कमी-अधिक होत असल्यामुळें वार्षिक धान्योत्पादन कमीजास्ती होणारच. भाववाढ न व्हावी एतदर्थ, सरकारी गुदामांत धान्य-सांठा करून योग्य वेळीं तें धान्य बाजारांत आणणें हा उपक्रम योग्य व अपरिहार्य.

पण ज्या अडचणीचा ग्रंथ लागत नाहीं ती अशी कीं, हें धान्य हिंदुस्थानांत खरीदणार नसून बाहेरून आयात करणार. तें कां, हें कळणें कठीण किंबहुना अशक्य आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत संकल्प केल्याप्रमाणें धान्योत्पादनांत अपेक्षित वाढ झाली आहे असें प्रसिद्ध करण्यांत आलें; किंबहुना वाढ अपेक्षेपेक्षाहि जास्ती झाली असेंच प्रसिद्धी खात्यानें सांगितलें. तशी वाढ झाली हें जर खरें असेल तर सांठवावयाच्या धान्याची बाहेरदेशाहून आयात करण्याची पाळी कां यावी? श्री. अजितप्रसाद जैन ( हिंदुस्थानचे धान्यमंत्री ) यांना तर बरींच वर्षे अंमल राहील अशी व्यवस्था असलेला करार ( धान्य पुरविणाऱ्या राष्ट्रांशीं ) पाहिजे आहे तो कां? कां धान्योत्पादनांत अपेक्षित वाढ झाली आहे, व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तर ती याहूनहि जास्त होणार आहे, ही माहितीच चुकीची व दिशाभूल करणारी?

पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील ज्या क्षेत्रपायनिक ( Irrigational ) प्रकल्पामुळें ( Projects ) ही धान्यवाढ अपेक्षित त्या योजना पुऱ्या होण्यापूर्वीच व धान्यपिकाला त्यांचें पाणी मिळण्यापूर्वीच अपेक्षित वाढ होणें शक्य तरी कसें आहे हें एक गूढच आहे.

जर योग्य इतकी धान्यवाढ देशांत झाली असती वा लवकरच होण्यासारखी परिस्थिति असती तर साठवावयाचें धान्य देशांतल्या देशांतच खरेदी केलें गेलें असतें. एकीकडे बाहेरून धान्य आयात करावयाचें व त्याबरोबरच देशांत भरपूर धान्यवाढ झाली आहे म्हणावयाचें, यानें नुसती विसंगतीच दिसून येत नाहीं तर त्यास खोट्या प्रचाराचा वासहि येतो. त्यांतल्या त्यांत धान्य-आयातीचा करार लांब मुदतीचा असावा याबद्दलची दक्षता स्तुत्य असली तरी कांहीं गोंधळच दर्शवीत नाहीं कां?

कळावें हे विनंती.

आपला,
न. सि जोशी

---

कलकत्त्यामधील नवीन रेल्वे—कलकत्ता शहर व उपनगरें ह्यांच्या दरम्यान वाहतूक करण्यासाठी विजेच्या गाड्या चालू करण्यांत येणार आहेत. ह्या योजनेसाठी ९ कोटी रुपये खर्च येणार आहे. कामासाठी लागणाऱ्या यांत्रिक साधनांच्या मागण्या १० देशांकडे नोंदण्यांत आल्या आहेत. कलकत्ता व हौरा ह्या भागांतील वाफेवर चालणारीं सर्व एंजिनें १९५९ च्या सुमारास रद्द करण्यांत येतील व त्यांची जागा विजेचीं एंजिनें घेतील.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स



स्थापना सन १९३५ टे. नं. २४५१८

दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा. बेंडे, श्री. झा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# अर्थ

बुधवार, ता. १५ एप्रिल, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कारखान्यांची सरकारी मालकीविरुद्ध खासगी मालकी

### अर्थमंत्र्यांचा खासगी कारखानदारांना इशारा

"सरकारी आणि खाजगी मालकीच्या कारखान्यांची संघटना व कार्यक्षमता ह्यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी एक कमिटी नेमण्यांत यावी" असा ठराव श्री. सोमाणी ह्यांनीं लोकसभेंत मांडला होता. त्यावर बोलतांना अर्थमंत्री, श्री. देशमुख हे म्हणाले, कीं हा प्रश्न विचारांत घेतांना दोन्हींच्या आर्थिक बाजूंपेक्षा, आपल्या देशानें स्वीकारलेल्या समाजवादी समाजरचनेस अधिक महत्त्व दिलें पाहिजे. सर्व उपलब्ध साधनांचा अधिकांत अधिक उपयोग झाला पाहिजे हें खरें असलें, तरी सरकारी व खासगी उपक्रमांतील फरकहि ध्यानांत बाळगला पाहिजे. पहिल्या प्रकारांत फारच मोठी भांडवली गुंतवणूक केलेली असते; अशी गुंतवणूक खासगी क्षेत्रांत जवळ जवळ अशक्य आहे. कांचेच्या घरांत राहणारांनीं, दुसऱ्याच्या घरावर दगड फेकूं नयेत, असा इशारा श्री. देशमुख ह्यांनीं खासगी कारखानदारांना दिला. ज्या पद्धतीनें हे कारखानदार नफे मिळवितात, ती पद्धत सरकारी कारखान्यांत आढळणार नाहीं. १९४८ सालीं, नियंत्रणें उठतांच, एक-दोन महिन्यांत कापडाच्या किंमती ७५% नें वाढल्या, खाजगी कारखान्यांचे मॅनेजिंग एजंटस ठोक नफ्याच्या १० ते १२½% नफा खातात, सरकारी मालकीच्या कारखान्यांत (उदाहरणार्थ, सिंद्रीच्या खाताच्या कारखान्यांत) व्यवस्थाखर्च फक्त ०.६% इतकाच येतो, ह्या सर्व गोष्टी काय दर्शवितात ?

श्री. देशमुख ह्यांनीं, "प्रश्नाचा एकाच बाजूनें विचार करूं नका" असा सल्ला देतांना, "आपल्या साधनसामुग्रीचा सर्वोत्कृष्ट उपयोग केला जात आहेना ?" एवढाच विचार दृष्टीसमोर ठेवण्याची सूचना केली. खाजगी कंपन्यांच्या भागदारांपेक्षा लोकसभेचे सभासद अधिक जागरूक असतात, असें त्यांनीं सांगितलें. एकंदरीनें पहातां, सरकारी कारखान्यांनीं समाधानकारक यश मिळविलें आहे, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. कांहीं चुका झाल्या असतील, पण भ्रष्टाचाराबद्दल विधानें करण्यांत भरमसाटपणा निर्माण होण्याचा संभव असतो. "खाजगी कंपन्यांचे चालक दररोज २०० रुपये भत्ता घेत असल्याचीं उदाहरणें आहेत. हे चालक सहकुटुंब हवा खाण्यासाठी प्रवासाला जातात, तेव्हां सर्वांचाच प्रवासखर्च कंपनीकडून घेतात. ज्यानें स्वतःचे पैसे खर्चून मोटारगाडी घेतली आहे, किंवा जो रहात्या घराचें भाडें स्वतः भरतो असा उद्योगपति क्वचितच माझ्या पहाण्यांत आला असेल. ते दिल्ली, मुंबई, कलकत्ता, कोठेंहि जावोत, सुखसंपन्न असे प्रासाद त्यांची वाट पहात असतात. त्यांच्या चहापार्ट्या व भोजनसमारंभ हे कंपनीच्या खर्चानेंच चालतात. सत्य बोलावयाचें, तर हें कटुसत्यहि प्रकट केलेंच पाहिजे." श्री. देशमुख ह्यांनीं खाजगी क्षेत्रांतील मॅनेजिंग एजंटांच्या ह्या सर्व गोष्टी लोकसभेंत उघड करून सांगितल्या, त्याचा अर्थच असा, कीं सरकारचें नवें औद्योगिक धोरण अधिक समाजवादी होणार असून त्या धोरणाच्या कसास उतरेल, असेच खाजगी उपक्रम ह्यापुढें चालू रहातील आणि त्यांच्या चालकांना आपल्या स्वतःवर अधिक कडक नियंत्रणें ठेवावीं लागतील; केवळ सरकारी खर्चिकपणावर टीका करून भागणार नाहीं. त्यामुळें, औद्योगिक क्षेत्रांत सुधारणा घडून आली, तर तें इष्ट असेंच होईल.

### प्रवरानगर येथील साखर कारखान्यांची परिषद

अखिल भारतीय सहकारी साखर कारखानेविषयक अभ्यास संमेलन प्रवरानगर येथें भरलें होतें. अध्यक्षस्थानीं प्रा. गाडगीळ हे होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत साखरेचे ३५ नवे कारखाने काढण्यासाठी परवाने देण्याचे सरकारनें ठरविलें आहे. हे परवाने देतांना सहकारी पद्धतीच्या साखरेच्या कारखान्यांना प्रथम पसंती देण्याच्या सरकारच्या धोरणाबद्दल संमेलनानें सरकारचें अभिनंदन केलें. तथापि असे परवाने देतांना एखाद्या विशिष्ट भागांत सहकारी कारखाना निघूं शकणार नाहीं ह्याबद्दल राज्य सरकारनें खात्री करून घेतल्यावरच खाजगी भांडवलदारांना परवाने देण्याचा विचार करण्यांत यावा, अशी विनंती करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें, खाजगी मालकीच्या एखाद्या साखरेच्या कारखान्याचा विस्तार होण्याची शक्यता असली अगर त्याची तशी मागणी असली तरी त्या कारणावरून सहकारी कारखान्याला परवाना नाकारण्यांत येऊं नये अशीहि सूचना संमेलनानें केली आहे. सहकारी साखर कारखाने काढण्याबाबत पुढीलप्रमाणें सवलतींची मागणी करण्यांत आली:—(१) सहकारी साखर कारखान्यांचे भाग घेण्यास इतर प्रकारच्या ग्रामीण सहकारी संस्थांना परवानगी असावी. (२) जेथें जरूर असेल तेथें राज्य सरकारची मदत आणखी वाढविण्यांत यावी. (३) कांहीं खास परिस्थितींत छोट्या शेतकऱ्यांना भाग विकत घेता यावे म्हणून सहकारी बँकांमार्फत मध्यम मुदतीचीं कर्जें मिळण्याची सोय करण्यांत यावी. सहकारी बँकांना ह्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून पैशाचें साह्य करण्यांत यावें. सध्यां इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून सहकारी कारखान्यांना यंत्रसामुग्रीसाठी, इमारतीसाठी व वर्कशॉपसाठी किंमतीच्या ६० टक्क्यांपर्यंत कर्ज दिलें जातें. त्याबद्दल समाधान व्यक्त करण्यांत आलें आणि सहकारी साखर कारखान्यांना दीर्घ मुदतीचीं आणखी कर्जें देण्याबद्दल कॉर्पोरेशननें अनमान करूं नये, असें सुचविण्यांत आलें.

### भारतांतील सोन्याच्या खाणी

भारतांत सध्यां सोन्याच्या चार खाणी चालू आहेत. त्यांचें उत्पादन गेल्या तीन वर्षांत खालीलप्रमाणें झालें:—

| वर्ष | लक्ष रु. |
|---|---|
| १९५३ | ५,०८ |
| १९५४ | ५,६२ |
| १९५५ | ५,३० |

## यांत्रिक दुरुस्तीचे फिरते कारखाने

भारतीय सरकारच्या व्यापार व उद्योगखात्यानें देशांत ग्रामोद्योगांची वाढ व्हावी म्हणून एक उपयुक्त उपक्रम चालू केला आहे. यांत्रिक साधनांचा उपयोग कसा करावा आणि तीं दुरुस्त कशी करावीं ह्यासंबंधी प्रात्यक्षिक देणारे दुरुस्तीचे फिरते कारखाने मोटारींच्या साह्यानें ग्रामीण भागांत हिंडत असतात. खेड्यांतील कामगारांना व वाकबगार लोकांना निरनिराळ्या ग्रामीण उद्योगधंद्यांत आधुनिक यंत्रसामुग्रीचा कसा उपयोग करतां येईल तें प्रात्यक्षिकांच्या द्वारें समजून देण्यांत येतें. प्रात्यक्षिक झाल्यावर खेड्यांतील लोकांशीं चर्चाहि करण्यांत येते. उत्पादनाच्या नवीन पद्धति आणि त्यांसाठी लागणारी यंत्र-सामुग्री ह्यांचें ज्ञानहि त्यांना करून देण्यांत येतें. त्याचप्रमाणें जरूर ती यंत्रसामुग्री सरकार हप्त्यानें देण्याची व्यवस्था करीत असल्याचेंहि त्यांना सांगण्यांत येतें. त्यामुळें हीं प्रात्यक्षिकें चांगलींच यशस्वी होत आहेत. विशेषतः मद्रास व मुंबई राज्यांत ह्या उपक्रमांचा चांगला फायदा होत आहे. पुष्कळ कामगारांनीं व वाकबगार हस्तव्यवसायिकांनीं आधुनिक पद्धतीची यंत्र-सामुग्री वापरण्यास सुरवात केली असून आपली पूर्वीची मागास-लेली उत्पादनपद्धति सोडून दिली आहे. भारतीय सरकारच्या उद्योग व व्यापारखात्यांत अशा प्रकारचीं औद्योगिक सल्लामसलत देणारीं चार केंद्रें चालू केलीं आहेत. छोट्या उद्योगधंद्यांसंबंधीं लोकांना मार्गदर्शन करण्याचें कार्य ह्या संस्थांच्या तर्फे करण्यात येत आहे. सध्यां दिल्ली, कलकत्ता, मद्रास आणि मुंबई ह्या चार ठिकाणीं संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय आग्रा, पाटणा, हैदराबाद आणि त्रिवेंद्रम् ह्या शहरांतून संस्थांच्या शाखाहि काढण्यांत आलेल्या आहेत. भारतामधील ग्रामीण भागांत काम करणाऱ्या ग्रामोद्योगांतील लोकांना अशा प्रकारचा सल्ला सुलभतेनें मिळणें जरूर आहे. पण दळणवळणांच्या योग्य साधनांच्या अभावीं तो मिळणें पुष्कळदां कठीण होऊन बसतें. मोटारींतील फिरते कारखाने गांवोगांव हिंडल्यानें हीं अडचण कांहीं प्रमाणांत दूर होईल.

---

## हिऱ्याची खाण सरकारनें ताब्यांत घेतली

विंध्य-प्रदेशांतील पन्ना नामक हिऱ्याची खाण आणि राज-स्थानमधील एक तांब्याची खाण भारतीय सरकारनें आपल्या ताब्यांत घेण्याची घोषणा भारतीय सरकारच्या नैसर्गिक साधन-संपत्तीच्या खात्याचे मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं लोकसभेंत केली. ह्या दोन्ही खाणी आतांपर्यंत खाजगी भांडवलदारांकडून चालविल्या जात होत्या. ह्या खाणीचें आतां राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत पन्ना येथील हिऱ्यांच्या खाणींचें उत्पादन हल्लींपेक्षा २० पटीनें, ३० पटीनें किंवा ४० पटीनेंहि अधिक होण्याची अपेक्षा आहे, असें मत श्री. मालवीय ह्यांनीं घोषणा करतांना व्यक्त केलें. श्री. मालवीय ह्यांच्या भाषणानंतर सरकारच्या तांब्याच्या खाणी-विषयींच्या धोरणासंबंधीं एका सरकारी प्रवक्त्यानें अधिकृत खुलासा केला. तो म्हणाला कीं, सध्यां खाजगी मालकांकडून चालविण्यांत येणारी राजस्थानमधील एक खाण सरकार सार्व-जनिक मालकीच्या भागांत समाविष्ट करीत आहे. बिहारमध्येंहि खाजगी रीत्या चालविली जाणारी एक तांब्याची खाण आहे. पण ती चालविण्यासाठी आपल्याकडे घेण्याचा सरकारचा विचार नाहीं. तथापि, ह्यापुढें तांब्याच्या ज्या खाणी काढण्यांत येतील त्या मात्र सरकार स्वतः चालविणार आहे. पन्ना येथील खाण चालवितांना कामगारांच्या सहकारी संघटनांचा उपयोग करून घेण्यांत येईल असेंहि श्री. मालवीय ह्यांनीं जाहीर केलें आहे. हिंदुस्थानांतील तांब्याच्या खाणीविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं भारतांत दरसाल अवघें ७,००० टन तांबें निर्माण करण्यांत येतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तांब्याच्या खाणी सरकारी मालकी-च्या करण्यांत येणार आहेत. राजस्थान व सिक्किममधील तांब्या-च्या खाणी चालविण्यासाठी घेण्याचा विचार सरकार करीत आहे. ह्या बाबतींत रशिअन तज्ज्ञांनीं सरकारला जो सल्ला दिला आहे, त्यावरून भारतीय भूस्तरशास्त्रज्ञांनीं दिलेल्या माहितीलाच दुजोरा मिळाला आहे. भारतीय शास्त्रज्ञांनीं खनिजविषयक पहाणी बऱ्याच ठिकाणीं केलेली आहे.

---

## अमेरिकेची प्रचंड विमानवाहक बोट

जगांतील बड्या राष्ट्रांच्या दरम्यान निःशस्त्रीकरणाची चर्चा गेलीं दहा वर्षें चालू आहे. तथापि त्याचवेळीं अमेरिका, रशिआ, ब्रिटनसारखीं राष्ट्रें युद्धाच्या साधनांची वाढहि करीत आहेत. ह्या साधनांवर किती अवाढव्य खर्च होत असेल ह्याची कल्पना अमेरिकेनें नुकत्याच बांधलेल्या ‘ साराटोगा ’ ह्या विमानवाहक बोटीवरून येऊं शकेल. ह्या बोटीचें वजन ६०,००० टन असून ती लढाऊ बोटींत सर्वांत मोठी व शक्तिशाली आहे. बोट बांध-ण्यास प्रारंभ सुमारें तीन वर्षांपूर्वी झाला. तिची गतीहि कोणत्याहि लढाऊ बोटीपेक्षा अधिक आहे. तिची लांबी सुप्रसिद्ध एम्पायर स्टेट ह्या गगनचुंबी इमारतीच्या ८० व्या मजल्याच्या उंचीची होईल. तिच्या डेकवरती प्रवाशांची वहातूक करणाऱ्या दोन मोठ्या बोटी एकमेकाला लावून ठेवतां येतील, इतकी ती रुंद आहे. ह्याच प्रकारची आणखी एक बोटहि अमेरिकेनें बांध-लेली आहे. पण ‘ साराटोगा ’ ह्या बोटीवर शस्त्रास्त्रांची सज्जता अधिक चांगली ठेवण्यांत आली आहे. बोटीचें एंजिन मुद्दाम तयार करण्यांत आलेलें आहे. त्याची शक्ति २,५०,००० अश्व-शक्ति आहे. कोणत्याहि अमेरिकन बोटीवर गति उत्पन्न करण्यासाठी एवढें थोरलें एंजिन अजूनपर्यंत बसविलेलें नाहीं. १०० रेल्वे एंजिनांची शक्ति आणि ह्या एंजिनांची शक्ति बरोबर आहे. तिची जास्तींत जास्त गति किती आहे, तें गुप्त ठेवण्यांत आलेलें आहे. परंतु ती दरताशीं ३८ मैल जाऊं शकेल असा अंदाज करण्यांत आलेला आहे. विमानांना उडण्यासाठी व उतरण्यासाठी वापरण्यांत येणाऱ्या डेकचें क्षेत्र ४ एकरां-पेक्षाहि थोडेंसें अधिक आहे. विमानें ठेवण्यासाठी जे विस्तृत तबेले बांधण्यांत आले आहेत त्यांचें क्षेत्र दोन एकर आहे. तबेल्यांतून १०० विमानें राहूं शकतील. बोटीच्या सर्व डेक्सवर ४०,००० माणसें उभीं राहूं शकतील. म्हणजे एकाद्या लहानशा शहराची सर्व लोकसंख्या बोटीवर सामावून घेतां येईल. खलाशी व अधिकारी मिळून ३,८०० जण असतील.

---

**इंदूरचें नवें रेल्वे-स्टेशन**—इंदूरच्या रेल्वे-स्टेशनच्या नव्या इमारतीचें औपचारिक उद्घाटन नुकतेंच झालें. इमारत दुमजली असून तिच्या बांधकामास १९५० च्या डिसेंबरांत प्रारंभ झाला होता. नव्या इमारतींत उतारूंसाठी पुष्कळच सोयी करण्यांत आलेल्या आहेत. ती बांधण्यासाठी २,४०,००० रुपये खर्च आला. इंदूर स्टेशनची पहिली इमारत १८७६ सालीं बांध-लेली होती. इंदूरसारख्या वाढत्या शहराला ती फारच अपुरी पडत असे.

## दि सांगली बँक लि.

**श्री. आर. व्ही. देशमुख, बी. ए., बी. लिट् (ऑक्स.) कलेक्टर, दक्षिण सातारा, (मुंबई सरकारचे एक्स ऑफिशिओ नॉमिनी) चेअरमन, ह्यांचें वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषण.**

"ह्या वर्षी बँकेनें ३९ वर्षे पुरीं केलीं आहेत, आणि १९५५ मध्येंहि बँकेनें आपली प्रगतीची परंपरा कायम राखली आहे. बँकेच्या आणखी वाढीच्या योजना तयार आहेत, पण सरकारी मालकीच्या बँकांच्या भवितव्यविषयक सरकारी निर्णयांवर त्यांची फलश्रुती अवलंबून आहे. सरकारनें सर्वांच्या हिताच्या दृष्टीनें आपलें धोरण शक्य तितक्या त्वरेनें जाहीर करणें इष्ट होईल.

"१९५५ मध्यें बँकेकडील ठेवींत २० लक्ष रुपयांची वाढ झाली; पुष्कळ बँकांच्या वांट्यास हा अनुभव आला असला तरी ठेवींतील ही भरघोस वाढ आपल्या बँकेच्या मजबुतीवरील जनतेच्या वाढत्या विश्वासाची निदर्शक आहे, ह्यांत संशय नाहीं. राष्ट्रीय उत्पन्नांतील सुधारणेबरोबर ही प्रवृत्तीहि वाढेल, अशी अपेक्षा आहे.

"पैशाचा तरतेपणा बँकेनें चांगल्या तऱ्हेनें राखला आहे; रोख, बँकांतील ठेवी व इन्व्हेस्टमेंट्स ह्यांचें बाहेरील देण्यांशीं प्रमाण सुमारें ५०% पडतें. कर्जाचें ठेवींशीं प्रमाण सुमारें ६०% असें कायम राखलें आहे. कर्जाला मागणी भरपूर आहे, पण कर्जावरील व्याजाचे दर ठेवींवरील व्याजाचे दराचे मानानें ताठर राहिले आहेत; त्या दोन्ही दरांतील फरक कमी कमी होऊन ती किफायशीर राहिलेली नाहीं. त्यावर बँकांना उपाययोजना करावी लागेल. मोठ्या बँकांनीं विघातक स्पर्धा करण्याचें टाळावें."

१९५५ सालीं सांगली बँक लि. ला १,३२,८०० रु. नफा झाला. जनरल रिझर्व्ह ३४,८४८ रु., इन्कमटॅक्स तरतूद ४०,००० रु. आणि बुडीत व संशयित कर्ज फंड ४,००० रु. अशी तरतूद करून भागीदारांना १२% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ५४,००० रुपयांचा विनियोग करण्यांत आला. बँकेनें २४-४-१९५५ रोजीं कोल्हापूर येथें शाखा सुरू केली, तिचा व्यवहार समाधानकारक चालू आहे.

## कापड गिरण्यांच्या उत्पादनांतील कपात

अहमदाबाद गिरणी-मालक संघाचे मावळते अध्यक्ष श्री. मदनमोहन मंगळदास ह्यांनीं कापडाच्या गिरण्यांतील कापडाच्या उत्पादनावर मर्यादा घालण्याच्या सरकारी धोरणाविरुद्ध इशारा दिला आहे. संघाच्या वार्षिक सभेच्या वेळीं बोलतांना ते म्हणाले, कीं सध्यांची परिस्थिति लक्षांत घेतां हातमागांना ठरवून देण्यांत आलेलें उत्पादनाचें लक्ष्य तें पुरें करण्याची शक्यता दिसत नाहीं तसें झाल्यास देशांत कापडाची फार मोठी टंचाई उत्पन्न होईल. त्याच्या किंमती वाढणें अपरिहार्य होईल आणि गिऱ्हाइकांना मोठा धक्का सहन करावा लागेल. कर्वे कमिटीनें कापडाच्या गिरण्यांच्या उत्पादनाला ५०० कोटी वारांची मर्यादा घातलेली असून त्याच्यापेक्षा अधिक येणारी कापडाची मागणी हातमागावर तयार होणाऱ्या कापडाचें उत्पादन वाढवून भागविण्याची सूचना केली आहे. ह्या सूचनेचा उल्लेख करून ते पुढें म्हणाले कीं कापडाच्या किंमती जर वाढल्या तर त्यामुळें भारताच्या कापडाच्या निर्यातीवरहि विपरीत परिणाम होईल. ह्या वर्षी कापडाच्या निर्यातींत घट झालेली दिसून येत आहे. शिवाय गिरण्यांतील कापडाच्या उत्पादनावरील मर्यादेमुळें सरकारचे अबकारी कराचें उत्पन्नहि बरेंच घटेल. १९६०-६१ च्या सुमारास भारतामधील कापडाची मागणी आणखीच वाढलेली असेल. ती भागविण्यासाठी देशांतील कापडाच्या गिरण्यांना आणखी २८० कोटी वार कापड निर्माण करण्याची संधि देण्यांत आली पाहिजे. भारतीय कापडाला परदेशीय बाजारपेठांतून वाढत्या स्पर्धेला तोंड द्यावें लागत आहे. अशावेळीं, गिरण्यांचें आधुनिकीकरण व रॅशनलायझेशन करणेंहि अतिशय जरूरीचें झालें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्याच्या क्षेत्राला मर्यादा घातल्याबद्दल त्यांनीं नापसंति व्यक्त केली. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी उद्योगधंद्यांनीं चांगली कामगिरी बजावलेली आहे. म्हणून दुसऱ्या कार्यक्रमांत त्यांना अधिक वाव देण्यास पाहिजे होता, असेंहि मत त्यांनीं व्यक्त केलें.

| | सांगली बँकेची प्रगति (आंकडे हजार रुपयांचे) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | १९५५ |
| (१) वसूल भांडवल | ३,०० | ३,०० | ४,५० | ४,५० | ४,५० | ४,५० |
| (२) रिझर्व्ह व इतर फंड | ३,३० | ३,७३ | ४,३९ | ५,०१ | ५,४९ | ६,२५ |
| (३) ठेवी | ७६,६० | ७९,३९ | ८५,९३ | ८७,९३ | ९९,३० | १,१९,६२ |
| (४) इन्व्हेस्टमेंटस् | २८,८२ | २४,६४ | ३०,०८ | ३१,०५ | ३४,०० | ४७,५३ |
| (५) रोख व बँकांत | १८,४९ | १८,२६ | २१,९० | १९,८८ | २०,२७ | १९,०० |
| (६) कर्जें | ४५,३४ | ४८,१८ | ४४,८० | ४७,८७ | ५७,७८ | ७१,१७ |
| (७) निव्वळ नफा | ७९ | १,१३ | १,१२ | १,१६ | १,२० | १,३३ |
| (८) खेळतें भांडवल | ९९,४९ | ९७,८४ | १०३,३४ | १०,६,४८ | १,२१,९८ | १,५२,०५ |

तमाम दंतरोगांवर
☆ नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## अमेरिकन शेतकऱ्यांच्या सहकारी मंडळांची प्रगति

अमेरिकेंतील पुष्कळ गांवांत शेतकऱ्यांचीं सहकारी मंडळें आहेत. गेल्या वर्षीं पुन्हां एकदां त्या मंडळांची सभासद-संख्या वाढलेली दिसली, असें अमेरिकन शेतीखात्यानें केलेल्या पहाणीवरून समजतें. १९५४-५५ सालीं शेतकऱ्यांच्या सहकारी मंडळांची सभासदसंख्या एकंदर ७६,००,००० होती, असें त्या पहाणींत दिसून आलें. त्यापूर्वींच्या वर्षांतील सभासद-संख्येपेक्षा ही संख्या १,००,००० नीं अधिक आहे.

### एकच शेतकरी अनेक मंडळांत

अमेरिकेंतील एकंदर सुमारें ५०,००,००० वैयक्तिक शेत-मालकांपैकीं ३०,००,००० शेत-मालक त्या मंडळाचे सभासद आहेत आणि वर दिलेली सभासद-संख्या त्यांचीच आहे. याचा अर्थ असा आहे कीं, पुष्कळ शेतकरी एकापेक्षा अधिक सहकारी मंडळांचे सभासद आहेत.

मालाची विक्री, शेतावर लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा, वगैरे कामें निरनिराळ्या सहकारी मंडळांकडून केलीं जातात, आणि एकच शेतकरी अनेक मंडळांचा सभासद असूं शकतो. हीं सर्व कामें एकाच संघटनेंत पार पाडणारीं अशींहि पुष्कळ मंडळें आहेत.

### सभासद-संख्येंत वाढ

अमेरिकेंतील शेतांचें यांत्रिकीकरण झालें असून एकेका शेतवाडींत कित्येक एकर जमिनींचा समावेश करण्याकडे प्रवृत्ति वाढली आहे. त्यामुळें शेतकऱ्यांच्या एकंदर संख्येंत घट होत आहे. तथापि, शेतकऱ्यांच्या सहकारी मंडळांतील सभासदांची संख्या मात्र अजून वाढत्या प्रमाणावर आहे, असें अमेरिकन शेतीखात्याच्या पाहाणींत दिसून आलें आहे.

### धंद्याची भरभराट

१९५४-५५ सालीं सहकारी मंडळांचा धंदा चांगला चालला. सुमारें ९५० कोटी डॉलरचा व्यवहार झाला. पहाणीच्या वर्षीं शेतीच्या उत्पादनापैकी पुष्कळशा मालाच्या किंमती उतरत होत्या, आणि गुरें वगैरे प्राणी, धान्य, चारा वगैरे ज्या आवश्यक वस्तूंची खरेदी सहकारी मंडळामार्फत केली जाते त्या वस्तूंच्या किंमती देखील घसरत होत्या. असें असूनहि पहाणीच्या वर्षांतील धंद्याच्या व्यवहाराचा आंकडा गेल्या वर्षींच्या आंकड्याइतकाच जवळ जवळ होता.

वर जी ९५० कोटी डॉलरची रक्कम दिली आहे, तिच्यापैकी सुमारें ७३० कोटी डॉलर शेतीच्या उत्पादनाच्या विक्रीनें आलेले आहेत. गिऱ्हाइकांसाठी शेतीच्या उपयोगाचा जो माल विकत घेतला होता त्याची किंमत सुमारें २०० कोटी डॉलरपर्यंत गेली. खिदमतीबद्दल (सर्विसेस) सुमारें १८ कोटी, ८० लक्ष डॉलर मिळाले.

गिऱ्हाइकांना पुरविलेल्या मालांत मोठ्यांत मोठा भरणा चाऱ्याचा होता. त्या चाऱ्याची किंमत ८१ कोटी डॉलर, म्हणजे खरेदी केलेल्या मालाच्या एकंदर निव्वळ किंमतीच्या सुमारें दोन पंचमांशाइतकी होती. गौळवाड्यांतील उत्पादित मालाची किंमत २४० कोटी डॉलर, म्हणजे बाजारांत पाठविलेल्या सर्व मालाच्या निव्वळ किंमतीच्या एक-तृतीयांशाइतकी होती.

### एकीकरणामुळें घट

सहकारी मंडळांचे सभासद वाढले असले तरी मंडळांची संख्या थोडी थोडी घटत राहिली. गेल्या आधींच्या वर्षीं १०,११४ मंडळें होतीं, तर गेल्या वर्षीं १०,०५८ होतीं. अनेक मंडळांचें एकीकरण झाल्यामुळें संख्येंत ही घट दिसून येत आहे.

**कुटुंबनियोजनाला विरोध**—म्हैसूर राज्यकुटुंबनियोजन-संघटनेच्या अध्यक्ष श्रीमती घोष ह्यांनीं आपला असा अनुभव सांगितला कीं, भारतांत कुटुंबनियोजनाच्या प्रसाराला पुरुषांकडूनच सामान्यतः विरोध होतो. ह्या विषयासंबंधी स्त्रियांनीं सल्लाहि घेऊं नये, असें त्यांचें मत असतें. कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्यासाठी पुरुष कार्यकर्त्यांनींच पुढें आलें पाहिजे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**कॅनडा-रशिआ व्यापारी करार**—गेल्या फेब्रुआरी महिन्यांत कॅनडा व रशिआ ह्या देशांच्या दरम्यान झालेल्या पहिल्या व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या. आतां कराराला कॅनडाच्या कॉमन्स सभागृहानें मान्यता दिली आहे. कराराच्या शर्तींप्रमाणें येत्या तीन वर्षांत रशिआनें कॅनडाकडून ४,४१,००,००० ते ५,५१,००,००० बुशेल गहूं विकत घ्यावयाचा आहे.

**The Brihan-Maharashtra Sugar Syndicate Ltd.**
**980 Sadashiv Peth, Laxmi Road, Poona 2**

## NOTICE

Notice is hereby given that the General Meeting of the Share-holders of The Brihan-Maharashtra Sugar Syndicate Ltd., Poona 2, will be held on Wednesday the 16th May 1956 at 3 P. M. at the Tilak Smarak Mandir, Tilak Road, Poona 2, when the following Ordinary Resolution will be moved:—

(1) Resolved that the Company be authorised to borrow money ( apart from temporary loans obtained from Company's Bankers in the ordinary course of business ) upto a limit of Rs. 50 lacs by way of Fixed Deposits.

Poona
Dated 30th
March 1956

By Order of the Board of Directors,
**C. G. Agashe & Co.**
Managing Agents

*Note*:- A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy or proxies to attend and vote instead of himself and that a prozy need not be a member.

**Explanatory Statement**

[ Sec. 293 of the Companies' Act I of 1956 ]

(1) The Board of Directors of a public Company shall not, except with the consent of such public Company, borrow moneys after the commencement of this Act i.e. 1st April 1956 where the moneys to be borrowed, together with the money already borrowed by the Company will exceed the aggregate of the paid up Capital of the Company and its free reserves.

(2) The paid up Capital of the Company by the end of March 1956 is Rs. 28,16,674/-.

(3) The amount of Fixed Deposits by the end of March 1956 is Rs. 43,20,066/-.

(4) The resolution is to sanction the limit of Fixed Depcsits to Rs. 50,00,000/-. The Company's own cane plantation is in 2,000 Acres and sugarcane grown in the said area would come to about 1,20,000 Tons. The Government rate of the said sugarcane is Rs. 44/- per ton and it would require about Rs. 52,80,000/- for the same and hence sanction of Rs. 50,00,000/- is sought.

## पोलादाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

जगांतील ज्या ज्या देशांना पोलादाचें उत्पादन वाढविण्याची नैसर्गिक अनुकूलता आहे, असे सर्वच देश आपलें उत्पादन वाढविण्याच्या योजना आंखीत आहेत. पोलादाला शांततेच्या कालांत जसें महत्त्व असतें तितकेंच किंवा त्यापेक्षाहि अधिक महत्त्व युद्धकाळांत असतें. सध्यां जगांतील पोलादाचें उत्पादन सुमारें २९,७०,००,००० टन आहे. येत्या चार वर्षांत ह्या उत्पादनांत ३० टक्क्यांनीं वाढ होईल. अमेरिकन निरीक्षकांनीं पोलादाच्या उत्पादनाची जगाला लागलेली भूक बकासुरी आहे, असें वर्णन केलें आहे. त्यांच्या मतानें योजनाबद्धरीतीनें उत्पादन वाढविण्यांत आल्यास जगांत औद्योगिक क्रांतीच्या दुसऱ्या युगालाच प्रारंभ होईल. अमेरिकेसारखीं मोठीं राष्ट्रें तर पोलादाचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न करीत आहेतच; पण थोड्या प्रमाणांत उत्पादन असणारीं लहानमोठीं ३० राष्ट्रेंहि अशाच योजना आंखीत आहेत. अमेरिकेचें पोलादाचें वार्षिक उत्पादन ११,००,००,००० टन आहे. पोलादाच्या कारखान्यांचा विस्तार करण्यासाठी येत्या कांहीं वर्षांत सर्व जगभर ८७,५०,००,००,००० रुपये भांडवल गुंतविण्यांत येणार आहे. उत्पादनांतील बहुतेक वाढ रशिआबाहेरील राष्ट्रांतूनच होणार आहे. तथापि, रशिआच्या गटांतील राष्ट्रांच्या उत्पादनाची टक्केवार वाढ मात्र १९६० च्या सुमारास अधिक असेल. बिगर कम्युनिस्ट राष्ट्रांचें पोलादाचें वार्षिक उत्पादन २२,८०,००,००० टन आहे. रशिआच्या गटांतील राष्ट्रांचें वार्षिक उत्पादन ६,९०,००,००० टन आहे. १९६० च्या सुमारांस रशिअन गट २८,१०,००,००० टन पोलाद निर्माण करूं लागेल. रशिअन गटाबाहेरील उत्पादन १०,२०,००,००० टन होईल. ह्या बाबतींत भारताचें स्थानहि बरेंच वर राहील. चार वर्षांच्या कालांत भारताचें उत्पादन २०,००,००० टनांवरून ६०,००,००० टनांपर्यंत जाईल.

---

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

वरील बँकेस १९५५ मध्यें तिच्या व्यवहारांत ९०,१६२ रु. नफा झाला. त्यांतून ४०,००० रु. ची इन्‌कमटॅक्सची तरतूद करून आणि १८,००० रु. गंगाजळी रिझर्व्हमध्यें टाकून ४% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी २६,००० रु. चा विनियोग करण्यांत आला. अहवालाचे वर्षी बँकेची सर्वांगीण वाढ झाली. ठेवींची रक्कम ७९ लक्ष रुपयांवरून ९१ लक्ष रुपयांवर गेली आणि खेळतें भांडवल ९२ लक्ष रुपयांचें १ कोटि, ९ लक्ष रु. झालें. निव्वळ नफाहि ८ हजारांनीं वाढला आहे. बँकेचें वसूल भांडवल ६,५०,००० असून रिझर्व्ह व इतर फंड २,१०,००० रु. चे आहेत, त्यांत आतां १८ हजारांची भर पडली आहे. बँकेनें एकूण ४१¾ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलेलीं असून तिची ५० लक्ष रुपयांची इन्व्हेस्टमेंट आहे. १ जानेवारी, १९५६ पासून बँकेनें कोल्हापूर येथील युनियन बँक ऑफ कोल्हापूर लि. चा बँकिंगचा व्यवहार आपल्या स्वतःकडे घेऊन बँकेच्या शाखा कोल्हापूर व हलकर्णी येथें सुरू केल्या आहेत. म्हणजे, आतां बँकेच्या आठ ठिकाणीं (मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी ) शाखा आहेत. ( चेअरमन : शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम. सेक्रेटरी : रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. )


**THE TRAVANCORE OGALE GLASS MANUFACTURING COMPANY LIMITED**

# NOTICE

The Thirteenth Annual General Meeting of the Shareholders of The Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited, will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Thursday, the 31st May, 1956, at 4 p. m., to transact the following business :

1. To read the Notice and Auditors' Report.
2. To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit & Loss Account for the year ended 31st December, 1955.
3. To consider the following Resolution :
   " Resolved that the accumulated losses of Rs. 2,30,091-14-6 be set off against the General Reserve of Rs. 1,10,000/- and the Dividend Equalisation Reserve of Rs. 40,000/-."
4. To elect a Director in place of Sri. Shankar Rao P. Ogale and being eligible offers himself for re-election, and for the purpose to pass a Special Resolution.
5. To elect a Director in place of Sri. Jacob Cherian who retires by rotation and being eligible offers himself for re-election.
6. To elect a Director in place of Sri. A. Raghunatha Rao who retires by rotation and being eligible offers himself for re-election.
7. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.
8. To consider Special Resolutions consenting to the continuing in employment of employees related to some of the Directors.
9. To transact any other business with the permission of the Chairman.

The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 21st May to Thursday, the 31st May, 1956, both days inclusive.

By order of the Board.
For **OGALE BROTHERS LIMITED,**
*Managing Agents.*

Alwaye, **N. P. OGALE,**
February 20, 1956 *Director.*

---

A member entitled to attend and vote at the meeting is entitled to appoint a proxy who will attend and vote instead of himself when pole is demanded and the proxy need not be a member.

**संयुक्त-राष्ट्र-संघटनेचें आंकडे-मंडळ**—संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आंकडे-मंडळाचे अध्यक्ष म्हणून भारताचे प्रा. महालनविस ह्यांची पुन्हा निवड झाली आहे. रशिआ व पोलंड ह्या दोन देशांनीं आपआपल्या आर्थिक परिस्थितीविषयीं कांहीं महत्त्वाची आकडेवार माहिती मंडळाकडे प्रथमच पाठविली आहे. ह्या माहितीमुळें आंतरराष्ट्रीय आंकडेवार माहितींत आजवर असलेला उणेपणा भरून येण्यास मदत होईल.

**ओरिसांतील खनिजाच्या खाणी**—ओरिसांतील खनिजांच्या खाणी चालविण्यासाठी भारतीय सरकार व राज्य सरकार स्वतंत्र कॉर्पोरेशन काढण्याची योजना तयार करीत आहेत. कॉर्पोरेशनसाठी लागणारें भांडवल दोन्ही सरकारें सारख्या प्रमाणांत उभारणार आहेत. सध्यां फक्त नवीन खाणीच चालविण्यास घेण्याचा इरादा आहे.

**अमरेळी जिल्ह्यांत साखरेचा कारखाना**—अमरेळी जिल्ह्यांत साखरेचा कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी सरकार १० लाख रुपये देईल, इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन, मुंबई, २२ लाख रुपये कर्ज देईल आणि ४० लाख रुपये सार्वजनिकरीत्या जमविण्यांत येतील. कारखान्यांत दरसाल ३,५०,००० टन साखर तयार होईल.

**ब्रह्मदेशाकडून तांदूळ घेणार**—भारताला तांदुळाचा पुरवठा करण्याचा करार करण्यासाठी ब्रह्मदेशाचें व्यापारी मंडळ लवकरच भारतांत येणार आहे असें समजतें. करारांतील मुख्य अटी तांदुळाची किंमत आणि ती देण्याची पद्धत ह्याबद्दल असतील. देशांत तांदुळाचा व गव्हाचा सांठा तयार ठेवण्याच्या सरकारच्या धोरणानुसार हीं बोलणीं होणार आहेत. ब्रह्मदेशाकडून १० लाख टन तांदूळ आयात होण्याचा संभव आहे.

**सीलोन आणि पूर्व जर्मनी ह्यांचा व्यापार**—सीलोनमध्यें नव्यानें अधिकारावर आलेल्या सरकारशीं व्यापारी बोलणीं करण्यासाठी पूर्व-जर्मनीचें एक प्रतिनिधी मंडळ कोलंबोला येणार आहे. पूर्व-जर्मनीचें सरकार चहा, रबर व इतर कच्चा माल घेण्यास तयार असून त्यांच्या बदला औद्योगिक सामुग्री देण्यास तयार आहे. कोलंबोमध्यें व्यापारविषयक कचेरी उघडण्याचाहि जर्मन सरकारचा बेत आहे.


अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —


किर्लोस्कर

आपल्या उन्हाळी पिकांची जोपासना करण्यासाठी ★

सेंट्रिफ्युगल पंप

(टाइप:-एन्. बी. एस्.)

★




अधिक माहिती मागवा

किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.